# ‘आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५’ मराठी अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामध्ये सेवा बजावत असलेले सुजित मुंढे यांनी मराठी भाषेमध्ये अनुवाद केलेले ‘आपत्ती व्यवस्थापन कायदा - २००५’ या मराठी अनुवाद पुस्तकाचे प्रकाशन जुना राजवाडा येथे झाले. यावेळी युवराज छत्रपती संभाजीराजे यांच्या हस्ते आणि अभय जायभाये व श्रीपाद देसाई यांच्यासह छत्रपती संभाजीराजे फाऊंडेशनचे पदाधिकारी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. यावेळी युवराज छत्रपती संभाजीराजे यांनी आपत्ती व्यवस्थापनाचा अभ्यास आणि प्रशिक्षण हा एक महत्त्वपूर्ण घटक असून, या मराठी अनुवाद पुस्तकाचा राज्यभरातील जनतेला निश्चित फायदा होईल, असे मत व्यक्त केले. यावेळी विवेक जाधवर, संग्राम मोरे, छत्रपती संभाजीराजे फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.